॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड   Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572   **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT**   website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246   E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र. : रासेयो/२०२४–२५/७५   दिनांक ०३/०७/२०२४

## परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: "एक पेड मॉ के नाम" ही मोहीम राबविणे बाबत.**

**संदर्भ:** मा. अजय बा. शिंदे, क्षेत्रीय निदेशक, रा.से.यो. क्षेत्रीय निदेशालय, पुणे यांचे जा.क्र. F.No.18/22/NSS/RD Pune/2024-25/740-796 Dated 03rd July 2024

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. अजय बा. शिंदे, क्षेत्रीय निदेशक, रा.से.यो. क्षेत्रीय निदेशालय, पुणे यांनी **युवा व्यवहार आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्र.** F.No. P.21/NSS/DTE/2023/1072-1088 Dated 02nd July 2024 रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मा. पंतप्रधान महोदयांनी त्यांच्या मन की बातमध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त **"एक पेड मॉ के नाम"** ही मोहीम सुरू केली आहे. सदरील मोहिमेत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे आणि भारत आणि जगभरातील प्रत्येकाने आपल्या आईला श्रध्दांजली म्हणून येणा–या काळात एक झाड लावावे असे आवाहन केले आहे. मातृत्व आणि पर्यावरण संवर्धन दोन्ही साजरे करण्यासाठी त्यांनी मातांसह वृक्ष लागवडीत जागतिक सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

तरी त्या अनुषंगाने रा.से.यो. राबविणा–या सर्व संलग्नीत महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील जागतिक पर्यावरण दिनानिमित्त **"एक पेड मॉ के नाम"** ही मोहीम राबविण्यात यावी व महाविद्यालयातील रा.से.यो. कार्यक्रम अधिका–यांनी माय भारत पोर्टलवर एक कार्यक्रम तयार करावा तसेच #Plant4Mother#एक_पेड_मॉ_के_नाम वापरून सोशल मिडिया हॅंडलवर लावलेल्या रोपटयांची छायाचित्रे अपलोड करावीत तसेच **एक पेड मॉ के नाम** मोहिमेचा संक्षिप्त अहवाल १) आयोजित वृक्षारोपन कार्यक्रमाची संख्या २) सहभागींची संख्या स्वंयसेवक/विद्यार्थी सहभागी झाले आहेत ३) लागवड केलेल्या रोपांची संख्या क्षेत्रीय निदेशालय पुणे व रा.से.यो. मंत्रालयास पाठवावयाची असल्यामुळे न चुकता प्रस्तुत विद्यापीठातील रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई–मेल वर पाठविण्यात यावीत, ही विनंती.

**डॉ. मल्लिकार्जुन करजगी**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिवांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा. जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत कार्यवाहीस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.